● रविवार, दि. ५ जानेवारी २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक १५८ वा ● किमंत २ रु. ● पा१.ने ४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अॅण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ MAHMAR/2013/50827




दर्पण दिन २०२५

## पत्रकार सन्मान सोहळा

## व नवनिर्वाचित आमदारांचा जाहीर सत्कार

मराठी वृत्तपत्राचे जनक आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांनी दर्पण हे मराठीतील सर्वात पहिले वृत्तपत्र ६ जानेवारी १८३२ रोजी सुरू केले. याच कारणामुळे ६ जानेवारी हा दिवस आपण संपूर्ण महाराष्ट्रात दर्पण दिन म्हणून साजरा करतो, याचं दिवशी आपण बाळशास्त्री जांभेकर यांचे स्मरण करुन त्यांच्या कार्याच्या आठवणींना उजाळा देत असतो. दर्पण दिनाचे औचित्य साधत सोमवार, दिनांक ६, जानेवारी २०२५ रोजी जालना शहरातील भारती लॉन्स या ठिकाणी पत्रकार सन्मान व नवनिर्वाचित आमदारांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमास पत्रकारांनी उपस्थिती राहुन कार्यक्रमाची शोभा वाढवावी ही विनंती. धन्यवाद !

पीसीएम 'जिल्हारत्न' पुरस्कार
ज्येष्ठ व युवा पत्रकार सन्मान पुरस्कार
पत्रकार-समाजसेवक पुरस्कार

पत्रकारांची जिल्हास्तरीय बॉक्स क्रिकेट लिग स्पर्धा
जिल्ह्यातील सर्व पत्रकारांचा सत्कार
पेपर वितरण करणाऱ्या मुलांना सायकल भेट

### जिल्ह्यातील नवनिर्वाचित आमदार महोदयांचा जाहीर सत्कार

**मा. श्री. अर्जुनरावजी खोतकर**
आमदार, जालना विधानसभा मतदार संघ

**मा. श्री. बबनरावजी लोणीकर**
आमदार, परतूर विधानसभा मतदार संघ

**मा. श्री. संतोष पा. दानवे**
आमदार, भोकरदन विधानसभा मतदार संघ

**मा. श्री. नारायणजी कुचे**
आमदार, बदनापूर विधानसभा मतदार संघ

**मा. श्री. डॉ. हिकमतदादा उढाण**
आमदार, घनसावंगी विधानसभा मतदार संघ

### कार्यक्रमाचे मुख्य वक्ते

**प्रा. विजयजी कमळे पाटील**
विषय : पत्रकार संरक्षण कायदा (पीएचडी (अपे : महाराष्ट्रातील पत्रकार संरक्षण कायदा स्वरुप व आव्हाने विशेष अभ्यास)
बीए, बीएमसीजे, एमए, एमसीजे, सेट, नेट, एलएलबी

**मा. श्री. प्रा. डॉ. प्रभूजी गोरे**
विषयः ऑनलाईन पत्रकारिता, संपादक, आधुनिक केसरी (छत्रपती संभाजीनगर)

**उद्घाटक : मा. श्री. घनश्यामसेठजी गोयल,** संचालक, कालिका स्टिल (स्टील मॅन्युफॅक्चरिंग असो. अध्यक्ष)

**अध्यक्ष : मा. श्री. शिवरतनजी मुंदडा,** उद्योजक (संस्थापक संपादक : दैनिक आनंद नगरी)

### प्रमुख पाहुणे

**मा. डॉ. श्री कल्याणजी काळे**
खासदार, जालना लोकसभा मतदार संघ

**मा. श्री. डॉ. श्रीकृष्णनाथजी पांचाळ**
जिल्हाधिकारी, जालना

**मा. श्री. अजयकुमारजी बन्सल**
पोलीस अधिक्षक, जालना

**मा. श्री. रावसाहेबजी पा. दानवे**
माजी केंद्रीय राज्यमंत्री, भारत सरकार

**मा. श्री. कैलासजी गोरंट्याल**
माजी आमदार, जालना

**मा. श्री. भास्करजी आबा दानवे**
जिल्हा उपाध्यक्ष, भाजपा जालना

**मा. श्री. संतोषजी खांडेकर**
आयुक्त/प्रशासक, शहर मनपा, जालना.

**मा. श्री. अंकुशरावजी देशमुख**
ज्येष्ठ पत्रकार

**मा. श्री. महेशजी जोशी**
राज्य सरचिटणीस, प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्र

**सोमवार ६ जानेवारी २०२४**
**वेळ सकाळी १०:३० मि**

**स्थळ**
**भारती लॉन्स**
भोकरदन नाका, राजुर रोड, जालना.

विनीत

**दीपक शेळके, दर्पण जैन, गणेश काबरा,**

नितेश महाजन, आमेर खान, शेख चांद पी.जे., नरेंद्र जौगड, बाबुजी तिवारी, सय्यद रफिक, सुनील भारती, प्रा. दत्ता देशमुख, मजहर सौदागर, आशिष तिवारी, दिनेश नंद, चैतन बजाज, शेख अशफाक, सौ. करुणा मैरे, शेख नबी सिपोराकर

**आयोजक : प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्र, जिल्हा जालना.**

## संपादकीय पान

## पाकिस्तान - तालिबान संघर्ष वाढला

पाकिस्तानच्या सीमावर्ती भागात तालिबानचे सरकार भारताशी समोरासमोर युद्ध करणे शक्य नसल्याने पाकिस्तानने दहशतवादाला खतपाणी घालून भारतात अराजकता माजवण्याचा प्रयत्न केला. विशेषतः जम्मू काश्मीर मध्ये त्यांनी दहशतवाद्यांना हाताशी धरून जम्मू काश्मीर कायम अस्थिर करण्याचा प्रयत्न केला. भारताशी लढण्यासाठी ज्या दहशतवादाचा पाकिस्तानने शस्त्र म्हणून वापर केला तेच दहशतवादाचे शस्त्र आता त्यांच्यावर बुमरांग होत आहे. तालिबान ही दहशतवादी संघटना आहे हे सर्व जगाने मान्य केले आहे. ज्या वेळी तालिबानने अफगाणिस्तानवर कब्जा मिळवला त्यावेळी जगातील बहुतेक देशांनी तालिबानच्या सरकारला मान्यता देण्यास नकार दिला मात्र पाकिस्तानने तालिबानला सुरवातीपासूनच समर्थन दिले. अफगाणिस्तानातील तालिबानी सरकारला मान्यता देणारा पाकिस्तान हा जगातील पहिला देश होता अर्थात त्यामागे त्यांचा वेगळा डाव होता. तालिबानला मान्यता दिल्यास तालिबानला सोबत घेऊन भारतात घुसखोरी करून भारतात अस्थिरता माजवता येईल तसेच जर भविष्यात भारताविरुद्ध लढाई झाली तर त्यात तालिबानची मदत घेता येईल हा पाकिस्तानचा डाव होता. आज मात्र त्यांचा डाव त्यांच्यावरच उलटला असून तालिबानने भारताशी पंगा न घेता पाकिस्तानशीच पंगा घेत पाकिस्तानातच घुसखोरी सुरू केली. मागील वर्षी पाकिस्तान आणि अफगाणिस्तान सीमेवर प्रचंड तणाव निर्माण झाला होता. तालिबानने पाकिस्तानी हद्दीत प्रवेश करून पाकिस्तानच्या सीमावर्ती भागातील एका जिल्ह्यात सरकार स्थापन केले होते. याची कबुली खैबर पखतूनच्या राज्यपालांनी प्रसार माध्यमांशी बोलताना दिली होती. पाकिस्तानच्या हातून हा भाग निघून गेल्याने पाकिस्तानमध्ये खळबळ माजली होती. हा होता या दोन्ही देशातील तणावाचा पहिला अंक. आता दोन्ही देशातील तणावाचा दुसरा अंक सुरू झाला आहे. काही दिवसांपूर्वी पाकिस्तानने अफगाणिस्तानच्या सीमावर्ती भागात हवाई हल्ले करून २ डझनाहून अधिक तालीबानिंना ठार केले. पाकिस्तानच्या या हवाई हल्ल्याला तालिबानने ही जशास तसे उत्तर दिले. अफगाणिस्तानने पाक अफगाण सीमेवर तैनात असलेल्या १९ पाकिस्तानी रेंजर्सला ठार केले इतकेच नाही तर अफगाणिस्तानने पाकिस्तानच्या २ चौक्यांवर देखील ताबा मिळवला. यावरून हे स्पष्ट झाले की आता पाकिस्तान आणि अफगाणिस्तान यांच्यात युद्ध सुरू झाले आहे. हा संघर्ष नजीकच्या काळात थांबेल असे वाटत नाही उलट वाढतच जाईल. पाकिस्तानने अफगाणिस्तानला कमी लेखून मोठी चूक केली आहे. पाकिस्तानकडे अत्याधुनिक शस्त्रसाठा आणि अफगाणिस्तानपेक्षा कैक पट अधिक सैन्य आहे. अफगाणिस्तानकडे आजही जुनेच शस्त्र असून त्यांची सैन्य संख्याही कमी आहे असे असले तरी तालिबानी सैन्याकडे जी जिद्द आहे ती पाकिस्तानी सैन्याकडे नाही. तालिबानी चिवट आणि लढाऊ आहेत. त्यांनी याआधी रशिया आणि अमेरिकेलाही चिवट झुंज दिली आहे त्यामुळे त्यांनी पाकिस्तानला गुडघे टेकवायला लावले तर आश्चर्य वाटायला नको. वास्तविक अफगाणिस्तानात जेंव्हा तालिबानचे सरकार आले तेंव्हा दोन्ही देशात सौहार्दाचे वातावरण होते मात्र अल कायदाचा मोठा दहशतवादी अल जवाहिरी पाकिस्तानात मारला गेला. अमेरिकेने त्याला पाकिस्तानात घुसून मारले. या सर्व कारवाईत पाकिस्तानने अमेरिकेला मदत केली असा आरोप तालिबानने केला आणि तेथून या दोन्ही देशातील संबंध बिघडले. त्यात पाकिस्तानने पाकिस्तानात राहणाऱ्या अफगाणिस्तानी नागरिकांना देशातून हाकलण्यास सुरवात केल्याने हा तणाव आणखी वाढला आता तर हा तणाव पराकोटीचा वाढला आहे. भारताचा काश्मीर प्रांत बळकावण्यासाठी तालिबानचा वापर करता येईल असे पाकिस्तानला वाटले होते त्याच तालिबानने आता पाकिस्तानचाच भूभाग बळकावून पाकिस्तानला चांगलेच तोंडघशी पाडले आहे. भारतासाठी खणलेल्या खड्ड्यात पाकिस्तानच गाढला जाऊ लागला आहे यालाच म्हणतात जैसी करणी वैसी भरणी!



**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## म्हणून मंत्रीपद नाही - मुनगंटीवार

**मुंबई -** लोकसभेत पराभव झालेल्या इतरांना मंत्रिपदं मिळाली, पण आपल्याला मंत्रिपद मिळालं नाही यामागे निवडणूक लढवण्यास जाहीर अनुत्सुकता दाखवल्याची शक्यता असेल असं भाजपचे आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी म्हटलं. मंत्रिमंडळाच्या विस्ताराआधी काही तास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी तशी शक्यता बोलून दाखवल्याचं सुधीर मुनगंटीवार यांनी म्हटलं. राज्यमंत्रिमंडळातून डावलल्यानंतर सुधीर मुनगंटीवार नाराज असल्याच्या चर्चा होत्या. सुधीर मुनगंटीवार म्हणाले की, मी लोकसभेत जाऊ इच्छित नव्हतो. माझ्या मनात महाराष्ट्रासाठी काही कल्पना होत्या. त्या अंमलात आणायच्या होत्या. छत्रपतींचा विचार मला प्रत्येक घर ते जगात पोहोचवायचा होता. सांस्कृतिक मंत्री म्हणून काम करताना अजून काही गोष्टी करायच्या होत्या. म्हणून लोकसभेत जायची इच्छा नव्हती. मुख्यमंत्रीपदाची स्वप्ने कधीच बघितली नाहीत. दिवसभर एवढं काम करतो की रात्री निवांत झोप लागते.

शिर्डी येथे संपन्न झालेल्या तृतीय महाराष्ट्र मंदिर न्यास परिषदेच्या निमित्ताने...

# तृतीय ‘महाराष्ट्र मंदिर न्यास परिषदे’त मंदिर संस्कृतीचे पुनरुत्थान!

मंदिरांना हिंदु धर्माचे वैभव मानले जाते. आपल्या देशातील मंदिरे ही चैतन्याचे स्रोत आहेत. मात्र सद्यः स्थितीत त्याच मंदिरांची स्थिती अत्यंत दयनीय झाली आहे. विकासकामांसाठी हिंदूंची प्राचीन मंदिरे पाडण्यात येत आहेत. मंदिरांना पर्यटनस्थळ वा व्यवसायाचे केंद्र म्हणून विकसित केले जात आहे. सरकारीकरण झालेल्या अनेक मंदिरांमध्ये भ्रष्टाचार झाला, हे उघड आहे. यावरून मंदिर संस्कृतीच्या रक्षणासाठी व्यापक लढा उभारण्याची किती आवश्यकता आहे, हेच लक्षात येते.यासाठीच महाराष्ट्र मंदिर महासंघ, विरार येथील श्री जीवदानी देवी संस्था, श्री ज्योतिर्लिंग भीमाशंकर देवस्थान, श्री साई पालखी निवारा आणि हिंदु जनजागृती समिती यांच्या संयुक्त विद्यमाने २४ आणि २५ डिसेंबर २०२४ या दिवशी श्री साई पालखी निवारा, शिर्डी येथे ‘तृतीय महाराष्ट्र मंदिर न्यास परिषद’ आयोजित करण्यात आली होती. ही परिषद मंदिरांच्या पुनरुज्जीवनाचा आरंभबिंदू ठरली.मंदिर संस्कृतीच्या पुनरुज्जीवनासाठी प्रत्येक हिंदूने सक्रिय योगदान देणे ही काळाची आवश्यकता आहे. या परिषदेच्या माध्यमातून दिशा घेऊन मंदिरांना पुनर्वैभव प्राप्त करून देण्यासाठी हिंदूंनी कृतीप्रवण व्हावे, यासाठी हा लेखप्रपंच !

अनेक संतांसह संपूर्ण महाराष्ट्रभरातून ८७५ हून अधिक मंदिराचे विश्वस्त, प्रतिनिधी आदींची परिषदेला उपस्थिती !

या परिषदेला श्रीक्षेत्र बेट कोपरगाव येथील राष्ट्रसंत जनार्दन स्वामी (मौनगिरीजी) महाराज समाधी मंदिराचे पू. रमेशगिरी महाराज, कोपरगाव येथील श्रीक्षेत्र राघवेश्वर देवस्थानचे मठाधिपती पू. राघवेश्वरानंदगिरी महाराज, सनातन संस्थेचे सद्गुरु सत्यवान कदम, सनातन संस्थेच्या सद्गुरु स्वाती खाडये, मुंबई येथील समस्त महाजन संघाचे अध्यक्ष श्री. गिरीष शहा, श्री जीवदानी देवी संस्थानचे अध्यक्ष श्री. प्रदीप तेंडोलकर मंदिर अभ्यासक श्री. संदीप सिंह आणि मंदिर महासंघाचे राष्ट्रीय संघटक श्री. सुनील घनवट, मुंबई येथील स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकाचे कार्याध्यक्ष श्री. रणजित सावरकर, शिर्डी मतदारसंघाचे खासदार श्री. भाऊसाहेब वाघचौरे, श्री ज्योतिर्लिंग भीमाशंकर देवस्थानचे सचिव अधिवक्ता सुरेश कौदरे, माजी धर्मादाय आयुक्त श्री. दिलीप देशमुख, ओझर येथील श्री विघ्नहर गणपती देवस्थान ट्रस्ट’चे उपाध्यक्ष श्री. तुषार कवडे, आदींसह संपूर्ण महाराष्ट्रभरातून ८७५ हून अधिक निमंत्रित मंदिराचे विश्वस्त, प्रतिनिधी, पुरोहित, मंदिरांच्या रक्षणासाठी लढा देणारे अधिवक्ते, अभ्यासक आदी संत, महंत या परिषदेला उपस्थित राहिले होते.

**मंदिर महासंघाच्या सदस्य नोंदणीचा प्रारंभ !**

या परिषदेत उपस्थितांनी काही महत्वपूर्ण निर्णय घेतले.यामध्ये मंदिर महासंघाच्या सदस्य नोंदणीचा प्रारंभ करण्यात आला, तसेच मंदिर महासंघाच्या ‘फेसबूक पेज’, ‘इन्स्टाग्राम’, तसेच ‘एक्स’ (ट्विटर) च्या अकाऊंटचा प्रारंभ करण्यात आले.सदस्य नोंदणी क्युआर कोड च्या माध्यमातून सुरू झाली आहे.

महाआरती आणि सुरक्षा समिती स्थापन करण्याचा महत्वपूर्ण निर्णय

प्रत्येक सप्ताहात गावातील मंदिरात सामूहिक आरती करणे आणि गावातील प्रत्येक मंदिरात सुरक्षा समितीची स्थापना करण्याचा निर्धार यावेळी एकमताने करण्यात आला.

संत महंत, मंदिर अभ्यासक आदींचे मंदिर रक्षणासाठी अमूल्य मार्गदर्शन!

हिंदूंचीच मंदिर सरकारच्या ताब्यात का ? असा प्रश्न विचारत ती मुक्त झाली पाहिजेत अशी मागणी नगर येथील सद्गुरु गंगागिरी महाराज संस्थानचे मठाधिपती पू. रामगिरी महाराज यांनी आपल्या मार्गदर्शनातून केली.कोट्यवधी रुपयांचे व्यवहार होत असूनही भारतातील एकही मशिद किंवा चर्च सरकारने ताब्यात घेतलेले नाही. अन्य धर्मियांची प्रार्थनास्थळे सरकारच्या ताब्यात नाही; मात्र हिंदूंचीच मंदिर सरकारच्या ताब्यात घेते आहे हे थांबलेच पाहिजे.

मंदिरांचे भंजन होणे हा हिंदु धर्मावरील घाला आहे. त्यामुळे मंदिरांच्या रक्षणासाठी सर्व हिंदूंनी एकत्र येऊन सनातन संस्कृतीचा ध्वज फडकवायला हवा, असे आवाहन श्रीक्षेत्र बेट कोपरगांव येथील राष्ट्रसंत जनार्दन स्वामी (मौनगिरीजी) महाराज समाधी मंदिराचे पू. रमेशगिरी महाराज यांनी आपल्या वाणीतून केले.

मंदिरांच्या माध्यमातून हिंदु समाजाचे जन्महिंदुपासून कर्महिंदुमध्ये रूपांतर करण्याचे महत्कार्य होते. यापुढील काळात मंदिरांना धर्मशिक्षणाचे केंद्र बनवायचे असेल, तर धर्मशिक्षणाच्या जोडीला धर्मरक्षणाचीही भूमिका घेण्याची आवश्यकता आहे, असे मार्गदर्शन सनातन संस्थेच्या सद्गुरु स्वाती खाडये यांनी केले.

मंदिर अभ्यासक श्री. संदीप सिंह म्हणाले, मंदिर हे उत्पन्न मिळवण्याचे साधन नाही, तर भक्तीचे केंद्र आहे, हे समजणे आवश्यक आहे. मंदिर आपल्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. जगभरात अनेक औद्योगिक शहरे आता लयाला जात आहेत; याऊलट भारतात उज्जैन, पाटलीपूत्र, रामेश्वरम्, काशी अशी तीर्थक्षेत्रे असलेली शहरे हजारो वर्षांपासून जीवंत आहेत; याचे कारणच ती सर्व मंदिरांच्या अर्थव्यवस्थेवर अवलंबून होती. या देशाची अर्थव्यवस्था मंदिरांमुळे उभी आहे.

मंदिरे, तसेच मंदिरांच्या भूमीवर झालेल्या अतिक्रमणाच्या विरोधात दर आठवड्यातून एकदा ‘मंदिर तेथे सामूहिक आरती’ करणे, काशी आणि मथुरा तीर्थत्रक्षेत्रांचा खटला जदलगती न्यायालयात चालवावा; सरकारने राज्यातील सर्व मंदिरे सरकारमुक्त करून ती भक्तांच्या स्वाधीन करावीत; मंदिरात भक्तांनी अर्पण केलेला निधी महाराष्ट्र सरकारने विकासकामांसाठी न वापरण्याची घोषणा करावी; महाराष्ट्रातील पौराणिक, ऐतिहासिक महत्त्व असलेल्य मंदिरांचा तात्काळ जीर्णोद्धार करण्यासाठी सरकारने अर्थसंकल्पात भरीव तरतूद करावी; तीर्थक्षेत्रे, श्रीक्षेत्रे, गडकिल्ले यांवर असलेल्या मंदिरांवर झालेल्या अतिक्रमणाचे महाराष्ट्र सरकारने सर्वेक्षण करून तात्काळ ती अतिक्रमणे दूर करावीत आदी ठराव यावेळी एकमताने संमत करण्यात आले.

दोन दिवसांच्या मंदिर परिषदेत मंदिरांच्या विविध समस्यांवर चर्चा, तज्ञ अन् मान्यवरांचे मार्गदर्शन, तसेच गटचर्चा घेण्यात आल्या. यात ‘मंदिरे सनातन धर्मप्रचाराची केंद्रे बनवणे’, ‘वक्फ कायद्या’द्वारे मंदिरांच्या भूमीवर अतिक्रमण आणि मंदिरे बळकावणे यांवर उपाय’, ‘मंदिरांमधील वस्रसंहिता’, ‘धर्मादाय आयुक्त कार्यालय आणि मंदिरांचा समन्वय’ आदी विषयांवर चर्चा करण्यात आली.

या परिषदेमध्ये मांडण्यात आलेल्या विचारांमधून आणि ठरावांमधून हिंदू धर्माच्या मंदिर संस्कृतीच्या पुनरुज्जीवनासाठी ठोस दिशा निश्चित झाली आहे. मंदिर हे केवळ श्रद्धास्थान नसून ते धर्मप्रसार, समाजघटन, आणि संस्कृती संवर्धनाचे केंद्र आहे. त्यामुळे मंदिरांवर होणारे अतिक्रमण, भ्रष्टाचार, आणि सरकारी हस्तक्षेप रोखणे ही प्रत्येक हिंदूची जबाबदारी असल्याचे लक्ष्यात आले आहे.

ही परिषद केवळ चर्चा किंवा ठरावांपुरती मर्यादित राहणार नाही, तर हिंदूंच्या मंदिर संस्कृतीच्या पुनरुज्जीवनासाठी निर्णायक पाऊल ठरणार आहे. मंदिर हे फक्त भक्तीचे केंद्र नसून, सनातन संस्कृतीचा आत्मा आणि हिंदू समाजाचे आधारस्तंभ आहे. आज मंदिरांवर होणारे हल्ले म्हणजे आपल्या संस्कृतीवर होणारा आघात आहे. या आव्हानांचा सामना करण्यासाठी संघटित प्रयत्नांची आवश्यकता आहे. या परिषदेने दिलेला निर्धार म्हणजे हिंदूंच्या सामूहिक शक्तीचा जागर आहे. आता प्रत्येक हिंदूने आपल्या श्रद्धास्थानांचे संरक्षण, जीर्णोद्धार, आणि स्वायत्तता यासाठी पुढे येऊन एक नव्या युगाचा प्रारंभ करायला हवा. यासाठी आठवड्याला ‘मंदिर तेथे सामूहिक आरती’ करण्याचा निर्णय नुकताच शिर्डी येथे ‘महाराष्ट्र मंदिर न्यास परिषदे’त एक हजारांहून अधिक मंदिरांच्या विश्वस्तांनी घेतला होता. त्याप्रमाणे या अनुषंगाने सोलापूर येथील श्रीवैष्णव मारुती देवस्थानात राज्यातील पहिली ‘सामूहिक आरती’ मोठ्या उत्साहाने आणि भावपूर्ण वातावरणात करण्यात आली. हा संघर्ष फक्त मंदिरांचा नव्हे, तर हिंदू धर्माच्या अस्मितेचा आणि भविष्यातील अस्तित्वाचा आहे. हिंदूंच्या संघटनानेच हे युद्ध जिंकले जाईल, आणि पुन्हा एकदा मंदिरांचे वैभव, श्रद्धा, आणि सन्मान प्रस्थापित होईल!

**संकलक : श्री. सुनील घनवट,**
**राष्ट्रीय संघटक, मंदिर महासंघ,**
**(संपर्क :७०२०३ ८३२६४)**

# कै.सौ.कमलताई जामकर महिला महाविद्यालय परभणी येथे विद्यार्थीनींचा वाचन संकल्प

**परभणी | प्रतिनिधी -** आजचा तरुण वर्ग वाचना पासून दूर जात आहे. ही बाब लक्षात घेता युवकांनी वाचनातून आपल्या व्यक्तीमत्त्वाचे भरणं पोषण साधत सकारात्मक सामाजिक प्रबोधना साठी वाचनाचा व्यासंग वाढवत नेत वाचन संस्कृती वाढीस लावावी असे आवाहन वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमाचे उदघाटन प्राचार्य डॉ. वसंतराव भोसले यांनी केले.

कै.सौ. कमलताई जामकर महिला महाविद्यालयात माँ जिजाऊ आणि सावित्रीबाई फुले यांची जयंती कार्यक्रम. वाचन संकल्प महाराष्ट्राचा या शासकीय उपक्रमाचा शुभारंभ प्रसंगी उदघाटक प्राचार्य डॉ. वसंतराव भोसले बोलत होते. यावेळी आयोजित ग्रंथप्रदर्शन आणि वाचन संकल्प उपक्रमाचे उदघाटन रिबीन कापून व जिजाऊ माँ साहेब, सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करुन करण्यात आले.

या उपक्रमात १ जानेवारी ते १५ जानेवारी २०२५ दरम्यान ३ जानेवारी रोजी ग्रंथप्रदर्शन, वाचन अभिरुची वाढीस लावण्या साठी विद्यार्थीनींनी ग्रंथालयातून आपल्या आवडीचे पुस्तक घेऊन वाचन करुन त्याचे परिक्षण करणे,वाचन कार्यशाळा,कथन कौशल्य, वाचन संवाद सामूहिक वाचन व वाचनाचे महत्त्व लोकांना पटवून देणे.आदी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्राचार्यांच्या मार्गदर्शनात उपप्राचार्य डॉ संगीता आवचार, वाचन संकल्प महाराष्ट्राचा परभणी जिल्हा समितीचे प्रा.अरुण पडघन,रासेयो परभणी जिल्हा समन्वयक.रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.नसिम बेगम, स्त्री अभ्यास केंद्राच्या प्रा.डॉ.संगीता लोमटे,ग्रंथालय विभाग प्रभारी प्रा.निर्मला जाधव,अनिल नायडू ,काशीराम कानकुडकेवार ,पठाण आदींसह ८७ विद्यार्थीनींनी वाचन करत योगदान दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.नसिम बेगम यांनी तर आभारप्रदर्शन प्रा.डॉ. संगीता लोमटे यांनी केले.



# केवळ रविवारीच नव्हे! तर दररोज बुद्ध विहारात आले पाहिजे - बी. बी. मेश्राम

**छत्रपती संभाजी नगर | प्रतिनिधी -** फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल व दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) च्या संयुक्त विद्यमाने २९ डिसेंबर २०२४ ला संबोधी बुद्ध विहार, अशोक कॉलनी, लासूर स्टेशन येथे ८२ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न झाली.

या कार्यशाळेला उद्घाटनपर मार्गदर्शन करताना आर. बी. नन्नावरे म्हणाले की, आपण शीलवान असले पाहिजे. तो धम्माचा प्राण आहे. करिता माणसाने माणसांशी माणसाप्रमाणे वागले पाहिजे. याप्रसंगी नंदा पगारे म्हणाल्या की, महिलांनी आपल्या मुलाबाळांसह विहारात आले पाहिजे. जमुना गायकवाड म्हणाल्या की, बाबासाहेब आंबेडकरांमुळे आपणांस बुद्ध कळाले म्हणून किमान रविवारी तरी बुद्ध विहारात आले पाहिजे. लताबाई पठारे म्हणाल्या की, भारताचे संविधान वाचविण्यासाठी सर्वांनीच एकत्रित येऊन लढा दिला पाहिजे. मंदाकिनी थोरात म्हणाल्या की, बाबासाहेबांच्या उपकाराचे ऋण आपण फेडले पाहिजे. परिघाबाई शिरसाठ म्हणाल्या की, बुद्ध, बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याला समजून घेण्यासाठी आपण विहारात गेले पाहिजे. प्रतापराव आमराव म्हणाले की, अनेक दिवसांपासून बोलण्यासाठी संधी मिळेल याची वाट पाहत होतो, पण हिंमत होत नव्हती. तरी स्टडी सर्कलच्या वतीने संधी प्राप्त झाली म्हणून हिंमत झाली आहे. संजय सातदिवे म्हणाले की, आपली माणसे एकत्र येतात पण इतर लोक सोबत येत नसल्याने बहुमत सिद्ध होत नाही. तरी अन्याय अत्याचाराच्या विरोधात एकजुटीने शांततेच्या मार्गाने लढा दिला पाहिजे. बहुतेक नागरिक भारताचे संविधानाविषयी अनभिज्ञ असल्याने ते पूर्वग्रहदुषित भावनेने वागतात. उद्योजक मिलिंद बागूल म्हणाले की, प्रत्येक रविवारी आपण ही संकल्पना राबविली पाहिजे. अंबादास नरवडे म्हणाले की, ज्या देशात आपला जन्म झाला त्या देशाचे व समाजाचे ऋण आपण फेडले पाहिजे. इंजिनिअर किशोर पाटील म्हणाले की, प्रत्येक रविवारी कुठल्यातरी विहारात गेल्याशिवाय चैन पडत नाही. बाबासाहेब आंबेडकर उशिरा माहीत पडले आहेत. तरी जाग आली तेव्हा सकाळ झाली असे समजून उर्वरीत आयुष्यात शेवटपर्यंत आंबेडकरी चळवळीचे कार्य करूनच प्राण सोडणार आहे. एड. राजू बागूल म्हणाले की, आम्ही भारताचे लोक म्हणून एकत्रित येऊन हक्क अधिकारासाठी संघर्ष केला पाहिजे. महादेव डांबरे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे तत्त्वज्ञान आपण अंगिकारले पाहिजे.

प्रमुख वक्ते अनिल जाधव ऊर्फ बापुजी म्हणाले की, भारतीय बौद्ध महासभा, भिक्खू संघ यांनी आपली जबाबदारी पार पाडली पाहिजे. धम्माची चळवळ गतिमान करण्यासाठी आपण प्रबोधनात्मक कार्य केले पाहिजे.

कार्यशाळेचा अध्यक्षीय समारोप करताना फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, विहारात पाली भाषेत म्हटलेल्या वंदना व इतर गाथेचा लोकभाषेत अर्थ समजावून सांगितला पाहिजे. मुलांवर बालवयात संस्कार व्हावेत म्हणून सत्येंद्र तेलतुंबडे यांनी नर्सरी व पूर्व प्राथमिक शिक्षणाचा धम्मानुसार आराखडा राबविण्याची योजना आखली आहे. त्याची अंमलबजावणी आपल्या विहारात करावी. आपली सत्ता यावी असे सर्वांना वाटत असले तरी सत्ता येण्यासाठी ज्या अटी व शर्थींची पूर्तता करावी लागते, ते करायला कुणी तयार नाहीत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, केवळ निवडणुका जिंकणे एवढेच राजकीय पक्षाचे काम नसून त्यांनी जनतेला त्यांचे हक्क अधिकार मिळवून देण्यासाठी संघटीत व्हावे म्हणून संघर्ष करायला लावले पाहिजे. करिता प्रबोधनात्मक कार्यक्रम राबविले पाहिजेत. आपल्या विहाराच्या भिंतीवर दहा सदस्यांची कार्यकारिणी व अकरा सदस्यांचे सल्लागार मंडळ निवडल्याचे नमूद केले आहे. तर मग हे सल्लागार मंडळ त्या कार्यकारीणीला काय सल्ला देतात? त्याची अंमलबजावणी कशी केली जाते? यावर सर्व सदस्यांनी सतर्क राहिले पाहिजे. जेणेकरून विहारे ही चळवळीची संस्कार केंद्रे म्हणून उदयास आली पाहिजेत.

आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्वप्नातील भारतीय समाज निर्माण करण्यासाठी समाजात लोकशाहीची अंमलबजावणी केली पाहिजे. करिता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २२ डिसेंबर १९५२ ला पुण्यातील डिस्ट्रीक्ट लॉ लायब्ररीत दिलेल्या संदेशाप्रमाणे लोकशाहीच्या पूर्वावर्ती शर्थी पूर्ण करण्यासाठी आपण कार्यप्रवण झाले पाहिजे. जीवनाचा अविभाज्य भाग म्हणून आपण आपल्या दररोजच्या वैयक्तिक जीवनात, कुटुंबात, संस्थेत, संघटनेत, समाजात लोकशाहीची अंमलबजावणी केली पाहिजे. करिता या अनुषंगाने चर्चा करण्यासाठी केवळ रविवारीच नव्हे! तर बौद्धांनी दररोज विहारात आलेच पाहिजे. म्हणून कुलुपबंद विहारे उघडी ठेवली पाहिजेत.

या कार्यशाळेचे प्रास्ताविक एड. विलास रामटेके व सुत्रसंचालन महादेव डांबरे यांनी केले. या कार्यशाळेला बी. बी. मेश्राम, उद्योजक मिलिंद बागूल, महादेव डांबरे, एड. राजू बागूल, इंजिनिअर किशोर पाटील, चंद्रभान पवार, शामराव बागूल, जगजीवन सातदिवे, मिलिंद साळवे, प्रताप आमराव, दगडू गजहंस, अंबादास नरवडे, पंडित शिरसाठ, उत्तमराव शिनगारे, रंजना नन्नावरे, लताबाई पठारे, जमुना गायकवाड, नंदा पगारे, मंदाकिनी थोरात, आशाताई गायकवाड, आर. बी. नन्नावरे, अनिल जाधव, मंगल पठारे, तन्वी पठारे, पी. बी. शिरसाठ, सुनिल दुशिंग, संजय सातदिवे, भिमराव त्रिभुवन, मनोहर त्रिभुवन इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते. अशाप्रकारे आर. बी. नन्नावरे यांच्या आभार प्रदर्शनाने कार्यशाळा हर्षोल्हासात संपन्न झाली.





जालना लोकसभा मतदार संघाचे खासदार कल्याण काळे यांच्या संपर्क कार्यालयाचे उदघाटन ह.भ.प. तावरे महाराज यांचे हस्ते शनिवार (दि ४) रोजी करण्यात आले. यावेळी यावेळी विजय अण्णा बोराडे, माजी मंत्री राजेश टोपे, माजी आ कैलास गोरंट्याल, काँग्रेस सेवादल प्रदेशाध्यक्ष विलास औताडे, आ राजेश राठोड, माजी आ चंद्रकांत दानवे, माजी आ संतोष सांबरे, काँग्रेस जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख, राष्ट्रवादी जिल्हा अध्यक्ष निसार देशमुख, शिवसेना उद्धव ठाकरे जिल्हा प्रमुख भास्कर अंबेकर, माजी नगराध्यक्ष बबलू चौधरी, एकबाल पाशा, मंठा कृ उ बा समिती सभापती ए जे बोराडे आदींसह महाविकास आघाडी घटक पक्षातील पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती. (छाया- जावेद तंबोली)

# खोतकरांच्या उमेदवारी अर्ज वैध कि अवैध?

## गोरंट्याल यांची मा. न्यायालय छ. संभाजीनगर खंडपीठात याचिका दाखल

**जालना । प्रतिनिधी -** जालना विधानसभा मतदार संघातील आपले प्रतिस्पर्धी उमेदवार अर्जुन खोतकर यांनी दाखल केलेल्या उमेदवारी अर्जावर आक्षेप घेतल्यानंतरही निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांनी घेतलेल्या निर्णयाविरुद्ध काँग्रेस पक्षाचे पराभूत उमेदवार कैलास गोरंटयाल यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठात याचिका दाखल केली आहे. यामुळे शिवसेना आमदार अर्जुन खोतकर यांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.




जालना विधानसभा निवडणुकीत उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर उमेदवारी अर्ज छाननीच्या वेळी काँग्रेसचे उमेदवार कैलास गोरंटयाल यांनी त्यांचे प्रतिस्पर्धी उमेदवार अर्जुन खोतकर यांच्या उमेदवारी अर्जबाबत लेखी स्वरूपात आक्षेप जालना विधानसभा निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे अर्ज दाखल केला होता. अर्जुन खोतकरांनी चुकीच्या फॉरमॅटमध्ये उमदवारी अर्ज दाखल केला असा आक्षेप गोरंटयाल यांनी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे दाखल केला असतांना निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी चुकीच्या पद्धतीने खोतकरांचा अर्ज आक्षेपानंतरही कायम ठेवल्याचा गोरंटयाल यांचा आरोप आहे. दाखल करण्यात आलेल्या आक्षेपावर निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांकडे तब्बल चार तास झालेल्या सुनावणीत आमच्या वकिलांच्या वतीने प्रभावीपणे युक्तिवाद करत आपले प्रतिस्पर्धी उमेदवार अर्जुन खोतकर यांचा उमेदवारी अर्ज रद्द करण्याची मागणी जालना विधानसभा मतदार संघाचे निवडणुक निर्णय अधिकारी यांच्याकडे केली होती.या सुनावणीनंतर तब्बल आठ तास निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांनी वेळकाढू धोरण अवलंबिले आणि शेवटी रात्री उशिरा आपले प्रतिस्पर्धी उमेदवार खोतकर यांचा उमेदवारी अर्ज रद्द न करता वैद्य ठरविला.निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या या निर्णयाला काँग्रेस पक्षाचे उमेदवार कैलास गोरंटयाल यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर येथील खंडपीठात याचिका दाखल करून आव्हान दिले आहे. याबाबतची माहिती गोरंटयाल यांनी आज शनिवारी पत्रकारांशी बोलतांना दिली. दरम्यान, न्यायदेवता आम्हाला योग्य न्याय देईल अशी अपेक्षाही गोरंटयाल यांनी यावेळी व्यक्त केली.

# जालना जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात सदस्य नोंदणी अभियान राबविणार - माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे

**जालना । प्रतिनिधी -** भारतीय जनता पार्टीच्या सदस्य नोंदणी अभियानाला अधिक गति देण्याच्या उद्देशाने रविवार ५ जानेवारी रोजी राज्यभर विशेष सदस्यता नोंदणी अभियान राबवण्यात येणार आहे. यामध्ये जालना जिल्ह्यात या विशेष सदस्य नोंदणी अभियानाची सुरुवात भाजपाचा प्रत्येक कार्यकर्ता रस्त्यावर उतरून प्रत्येक बूथ पर्यंत पोहोचून जास्तीतजास्त नागरिक भाजपाशी जोडला जाईल यासाठी प्रयत्न करणार आहेत.

माजी केंद्रीय राज्यमंत्री श्री.रावसाहेब पाटील दानवे यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की, विकसित भारत घडविण्याचे ध्येय डोळ्यांसमोर ठेवून आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदीजींच्या नेतृत्वात आपला देश त्यादिशेने वाटचाल करत आहे. याच वाटचालीचा एक भाग म्हणून आदरणीय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वात विकसित महाराष्ट्र घडवण्याचे ध्येय आपण सर्वांनी बाळगले आहे. भाजपची संघटना अधिक बळकट व्हावी आणि आगामी निवडणुकांमध्ये पक्षाचे वर्चस्व वाढावे, यासाठी सदस्य नोंदणी अभियान महत्त्वपूर्ण आहे. आगामी महापालिकेच्या निवडणुकीमध्ये यश मिळवण्यासाठी प्रत्येक घराघरात पोहोचण्याचे काम या सदस्यता अभियानाद्वारे करावे लागेल. भाजपा पक्ष हा एक विशाल कुटुंब आहे. अधिक सदस्य नोंदणी केल्याने पक्षाची ताकद वाढते आणि आपण अधिक लोकांपर्यंत पोहोचू शकतो, ही बाब लक्षात घेत अनेक सामाजिक कार्यकर्ते भाजपा परिवारात प्रवेश करत आहेत. आपण सर्वांनी ही भाजपचे सदस्यत्व स्वीकारून



देशसेवेच्या कार्यात स्वतःला झोकून द्यावे व सर्वांनी रचनात्मक नियोजन करून प्रत्येक बूथवर २०० सदस्य नोंदणीचे उद्दिष्ट निश्चित ठेवावे असे आवाहन माजी केंद्रीय मंत्री श्री.रावसाहेब पाटील दानवे यांनी केले आहे.

# सरकारविरोधात आवाज काढताच नोटीस

**मुंबई -** सरकारविरोधात आवाज काढताच कार्टुनिस्ट सतीश आचार्य यांना मुंबई लॉ एन्फोर्समेंट एजन्सीकडून नोटीस बजावण्यात आली आहे. व्यंगचित्रकार सतीश आचार्य यांनी राजकीय संघर्षाबाबत काही व्यंगचित्र काढले होते. आचार्य यांचे व्यंगचित्र सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाले होते. दरम्यान, सरकारविरोधात व्यंगचित्र काढल्यानंतर आता सतीश आचार्य यांना मुंबई लॉ एन्फोर्समेंट एजन्सीची नोटीस आल्याचे बोलले जात आहे.

## व्हाईस ऑफ मिडीयाची परतूर तालुका कार्यकारणी जाहीर

# अजय देसाई यांची अध्यक्षपदी तर केदार शर्मा यांची कार्याध्यक्षपदी



**परतूर । प्रतिनिधी -** देशातील नंबर एकची संघटना अशी नोंद असलेल्या व्हॉइस ऑफ मिडिया या आंतरराष्ट्रीय संघटनेचे मराठवाडा उपाध्यक्ष राजेश भालेराव, जिल्हाध्यक्ष अविनाश कवळे तसेच जिल्हा सचिव रविकांत दानम यांच्या मार्गदर्शनाखाली व मावळते अध्यक्ष भारत सवने यांच्या उपस्थितीत शासकीय विश्रामगृह परतूर येथे दि ४ जानेवारी शनिवार रोजी दुपारी १२ वाजता लोकशाही पध्दतीने परतूर तालुक्याची कार्यकारणी जाहीर करण्यात आली. सर्व सदस्यांनी हात वरती करून मतदान घेण्यात आले त्यातून तालुकाध्यक्षपदी जेष्ठ पत्रकार अजय देसाई तर , कार्यअध्यक्ष पदी केदार शर्मा यांची व सचिवपदी अर्जुन पाडेवार, तर उपाध्यक्षपदी कैलास सोळंके व राजेश नाईक यांची निवड करण्यात आली उर्वरित कार्यकारणीत सह सचिव माणिक जैस्वाल, कोषाध्यक्ष भाऊसाहेब पाटिल मुके, संघटक आशिष धुमाळ, सह संघटक सर्फराज नाईकवाडी, सल्लागार् शेषराव वायाळ, एम. एल. कुरेशी, राजकुमार भारूका, आशिष गारकर, भारत सवने, रामप्रसाद नवल, हारून कच्छी, बालाजी ढोबळे, मोहन सोळंके तर उद्धव डोळस, सदस्य पदी प्रा. शरद बोराडे, अशोक दहिभाते, अशोक साकळकर, अशोक ठोके, राजाभाऊ भदर्गे, तारेख शेख, मुमताज, अन्सारी, अक्षय राऊत, विष्णू सोळंके, सचिन खरात, अजित जमीनदार, रमेश अंकुशकर, मारुती घोरबांड, दीपक भदर्गे अंगद मुंढे यांची निवड करण्यात झाली.

कार्यक्रमा च्या वेळी नवनिर्वाचित तालुकाध्यक्ष अजय देसाई यांनी बोलताना म्हणाले, जागतिक पातळीवर पत्रकारासाठी न्याय हक्कासाठी काम करणारी एकमेव संघटना म्हणून व्हाईस ऑफ मीडिया काम करते. पत्रकारासाठी कौशल्य शिक्षण, घरकुल, आरोग्य, निवृत्तीनंतर पेन्शन योजना आदी पत्रकाराच्या प्रश्नासाठी संघटना काम करत आहे. ग्रामीण भागातील पत्रकार सक्षम झाला पाहिजे, छोटे-मोठे उद्योग आदी पंचसूत्री कार्यक्रम घेऊन संघटनेची वाटचाल सुरू असल्याचे सांगितले. यावेळी व्हॉईस ऑफ मीडिया च्या परतूर तालुका अध्यक्षा सह सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे जेष्ठ पत्रकार शेषराव वायाळ यांनी पुष्प हार घालून सत्कार करण्यात आला. या निवड बद्दल सर्व कार्यकारनिस तालुका व ग्रामीण भागातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.


युवा आदर्श

नोटीस ...

वितभर कागदांत
टिचभर रे नोटीस
करु लागले गर्दी
वरिष्ठांच्या भेटीस
सुतासारखे सरळ
आले वाटाघाटीस
नव्या पक्षाचे चिन्ह
चिकटवले पाटीस
नवा घरोबा केला
वैतागून कटकटीस
जेलबंद कितीतरी
अनुभव बा गाठीस
इन कमींग वाढले
सारे येई अंगचटीस
जागा नाही बसाया
कंटाळे रेटा रेटीस
जुना पक्ष मोडीत
श्रेष्ठींना धरा वेठीस
लुटमार कुणी करे
कुलूप नाही पेटीस
तेल खूप माखलेले
ईडी पुलिस लाठीस
पळापळ चाललेली
लफडे जोडे पाठीस

हेमंत मुसरीफ पुणे
9730306996.


## मराठा क्रांती मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांची कदिम जालना पोलीस ठाण्यात बैठक

# मयत सरपंच संतोष देशमुख यांना न्याय मिळावा या मागणीसाठी मोर्चाचे आयोजन



**जालना । प्रतिनिधी -** जालन्यात १० जानेवारी रोजी महा जनआक्रोश मोर्चा काढण्यात येणार आहे. मस्साजोग गावाचे मयत सरपंच संतोष देशमुख यांना न्याय मिळावा या मागणीसाठी मोर्चाचे आयोजन करण्यात आलंय. मराठा क्रांती मोर्चा आणि समविचारी संघटना १० जानेवारी रोजी एकत्रित हा महा जनआक्रोश मोर्चा काढणार आहे. शहरातील गांधी चमन ते जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत हा मोर्चा आयोजित करण्यात आलाय. या मोर्चाच्या अनुषंगाने आज दिनांक ४ जानेवारी रोजी मराठा क्रांती मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हा पोलिस अधीक्षक कार्यालय येथे जिल्हा विशेष शाखेचे पोलीस निरीक्षक महादेव चव्हाण यांचीभेट घेऊन व परवानगी चे पत्र देऊन कदिम जालना पोलिस ठाण्यात पोलीस निरीक्षक सिद्धार्थ माने यांनी मराठा क्रांती मोर्चा ची प्रार्थमिक बैठक घेऊन शांततेत मोर्चा काढावा कुठेही अनुचित प्रकार घडणार नाही याची काळजी घ्यावी असे आव्हान पोलीस रिक्षक माने यांनी केले आहे यावेळी जिल्हा विशेष शाखेचे कैलास जावळे,मराठा क्रांती मोर्चाचेअरविंद देशमुख, देवकण वाघ ,विशंबर तिरूखे ,पंकज जराड ,संदीप ताडगे ,अशोक पडुळ ,कारभारी मसलेकर, गजानन काळे ,विष्णू घनगाव, एडवोकेट सुरेश ढवळे ,आदींची उपस्थिती होती

# शिवाजीराव आर्दड यांचे निधन

**जालना -** येथील जालना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे सेवानिवृत्त अधिकारी शिवाजीराव दाजीसाहेब आर्दड यांचे नुकतेच निधन झाले असून त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, नातवंडे असा परिवार आहे.

श्री. शिवाजीराव आर्दड हे सहकार बँक कॉलनीतील गजानन महाराज मंदिर संस्थानचे अध्यक्ष तसेच कर्मचारी युनियनचे अध्यक्ष व कर्मचारी सहकारी पतस्थेचे संस्थापक अध्यक्षही होते. अत्यंत मनमिळावू स्वभावाचे होते. म्हणूनच त्यांचा मृतदेह प्रारंभी जालना येथे अत्यंदर्शनासाठी ठेवण्यात आल्यानंतर त्यांच्या मुळ गावी म्हणजे राजाटाकळी ता. घनसावंगी येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.



# दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी करिअर, समुपदेशन कार्यशाळेचे आयोजन

**परतूर । प्रतिनिधी -** परतुरात दि.०३/०१/२०२५, जानेवारी रोजी इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी करियर मार्गदर्शन व समुपदेशन कार्यशाळेचे आयोजन शाळेच्या वतीने परतूर येथील मराठा क्रांती भवन या मध्ये करण्यात आले होते. यावेळी हा उपक्रम यशस्वी होण्यासाठी टाटा पावर मुंबई, अगस्त्या फाउंडेशन, स्वरूप करियर मार्गदर्शन पुणे, मराठा क्रांती भवन परतूर, डॉक्टर रोशन मोरे स्वरूप करिअर मार्गदर्शन पुणे, राठोड सर अगस्त्या फाउंडेशन, मा. मुख्याध्यापक,व व्यवस्थापन समिती



अध्यक्ष, सर्व सदस्य, इयत्ता दहावीचे विद्यार्थी, पालक पीएम श्री जिल्हा परिषद प्रशाला परतूर या सर्वांच्या सहकार्याने उपक्रम यशस्वी झाला. विद्यार्थी आणि पालक यांच्या बोलक्या प्रतिक्रियेने जाणवले की विद्यार्थ्यांना भविष्यात या उपक्रमाचा करिअर निवडण्यासाठी नक्कीच फायदा होईल.

# सातत्यपूर्ण प्रयत्नाने वाचन पातळी सुधारता येत असल्याचे जेईएफच्या अभ्यासाचे निष्कर्ष - प्रा. लाहोटी

## चौथी ते सहावीतील विद्यार्थ्यांच्या वाचन कौशल्याचा प्रश्नही गंभीर

**जालना । प्रतिनिधी -** प्रशासनाने मराठवाडा विभागातील ८ पैकी ६ जिल्ह्यात केलेल्या सर्वेक्षणाच्या आधारावर मराठवाड्यातील पहिली व दुसरीच्या जवळपास २९ टक्के विद्यार्थ्यांना त्यांच्या वर्गातील पातळीचे वाचन येत नाही, हा अहवाल धक्कादायक मानला जात असलातरी, ही बाब आमच्यासाठी मुळीच धक्कादायक नाही. कारण याच विषयावर जालना एज्युकेशन फाउंडेशन १२ वर्षापासून काम करत असल्यामुळे मुलांच्या वाचन कौशल्याची जाणीव आहे. त्याहीपुढचे सांगायचे झाल्यास, ही समस्या केवळ लहान मुलांपुरतीच मर्यादित नसून, पाचवीत शिकणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांना दुसऱ्या वर्गाच्या पातळीवरील वाचनही जमत नाही, अशी माहिती फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. सुरेश लाहोटी यांनी दिली. वाचनाचे संकट गंभीर असलेतरी आणि त्यावर जालना एज्युकेशन फाउंडेशनने शोधलेले काही उपाय वाचन पातळी वाढविण्यासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरत असल्याचे त्यांनी सांगितले.



यासंदर्भात अधिक माहिती देताना, प्रा. लाहोटी यांनी सांगितले की, सन २०२४-२५ मध्ये जालना जिल्ह्यात सुरू असलेल्या ५० पढो जालना कम्युनिटी सेंटरमधील १५०० विद्यार्थ्यांमध्ये फक्त निम्म्या विद्यार्थ्यांना पहिल्या वर्गाच्या पातळीवरील परिच्छेद वाचता येतो. प्रत्येक विद्यार्थ्याची वेगवेगळी ५ मिनिटाची वाचन कौशल्य तपासणी करण्यात आली. हे विद्यार्थी चौथी ते सहावी वर्गात आहेत. दुसऱ्या वर्गाच्या पातळीवरील गोष्टी फक्त तीनपैकी एका विद्यार्थ्याला वाचता येतात. फक्त १५ टक्के विद्यार्थ्यांना वाचलेले समजते तर एक तृतीयांश विद्यार्थ्यांना फक्त अक्षर ओळखता येते, असे चिंताजनक निष्कर्ष समोर आले आहेत. आमची वाचन तपासणी पद्धत अतिशय सोपी, मुलांसाठी अनुकूल व सोयीस्कर आहे. यात म ोकळ्या वातावरणात अक्षर ओळखणे, शब्द वाचन, गोष्टी वाचन व आकलन अश्या सहा पातळ्यांवरील वाचन कौशल्यांची तपासणी केली जाते. ही परिस्थिती अत्यंत चिंताजनक आहे. परंतु, सातत्यपूर्ण प्रयत्नांनी ती सुधारता येते हे आम्ही आमच्या कामातून दाखविले आहे. वाचन क्षमता वृद्धिंगत करण्यासह वाचन मजेदार बनविण्यासाठी आम्ही केलेले काही उपक्रम पुढीलप्रमाणे आहेत; ज्यातून विद्यार्थ्यांची वाचन पातळी वृद्धिंगत झालेली आहे.

**मज्जाच-मज्जा वाचन सप्ताह :**

मज्जाच मज्जा हा वाचनाचा उत्सव मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी घेतला जातो. आठवडाभर मुलांना त्यांच्या वाचन पातळीनुसार गोष्टीची पुस्तके वाचायला दिली जातात, त्यावर आधारित नाटके सादर करायला लावली जातात, वाचनावर आधारित खेळ खेळवले जातात. याम ुळे मुलांना प्रोत्साहन मिळते आणि शेवटी प्रमाणपत्र व बक्षिस याप्रमाणे वाचन उत्सव साजरा केला जातो. या कार्यक्रमामुळे गोष्टी वाचू शकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या दुप्पट झालेली आहे.

**रीड-अलॉंग मोबाइल ॲप:**


आम्ही मोफत मोबाइल प - रीड अलॉंग (ठशरव श्रेपस लू ऱ्रेसश्रश) वापरून घरी दररोज वाचण्यासाठी प्रोत्साहित करतो. मुलांची वाचन क्षमता सुधारण्यासाठी हे प ख तंत्रज्ञान वापरते. हे विशेषतः मुलांमध्ये लोकप्रिय आहे आणि त्यांना मजेदार म ार्गाने वाचन सुधारण्यास मदत झाली आहे.

मराठी वाचन पुस्तक :

वाचनासाठी आकर्षक सामग्रीची कमतरता लक्षात घेऊन आम्ही विविध पातळीवरील २२ गोष्टींचा संग्रह असलेले मराठी वाचन पुस्तक तयार केले आहे. दोन वर्षांत कम्युनिटी सेंटरमधील ५ हजारापेक्षा जास्त विद्यार्थ्यांना हे पुस्तक निशुल्क वितरित करण्यात आले आहे.

**वाचनासाठी पाठ्यक्रम योजना :**

कम्युनिटी सेंटरम धील शिक्षकांसाठी विशेष पाठनियोजन तयार करून दिले जाते. यामध्ये गोष्टी वाचन, वाचन खेळ व इतर उपक्रम कसे घ्यावेत, याबाबतची सखोल माहिती दिली जाते.



**वाचन मेळाव्याची फलश्रुती :**

२०२३-२४ मध्ये वाचन शिबिरामध्ये सहभागी झाल्यानंतर वाचन करणाऱ्या मुलांची संख्या ५२ टक्क्यापर्यंत वाढली आहे. आकलन स्तरावर वाचन करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या दुपटीने वाढली आहे. हे सर्व फक्त २०० रुपये प्रति विद्यार्थी या खर्चात शक्य झाले आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार २०२५ पर्यंत म ुलांना वाचनात निपुण बनवणे अत्यावश्यक आहे. आम्ही सिद्ध केले आहे की परिणाम कारक उपाय सोपे आणि परवडणारे असू शकतात. आमची सर्व सामग्री व साधने विनामूल्य उपलब्ध आहेत. शाळा, संस्था व समाजाने एकत्र येऊन या मोहिमेत सहभागी होऊन प्रयत्नांनी प्रत्येक म ुलाला वाचन शिकवूया, अशी साद प्रा. सुरेश लाहोटी यांनी घातली.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.